# माया पंडित यांच्या तीन कविता

## अगतिक गतीने

शिणले पाय चालत जाताना
या लांबच्या लांब रस्त्यावरून
अगतिक गतीने.
उन्हाच्या झळांनी होरपळ झाली
बिनसावलीची जी आपली
ती आगल्यामागल्याची होऊ नये
म्हणून अंगीची सावली घातली
गोधड करून त्याच्यावर
तर साराच गदारोळ उसळला
बाजू आडबाजूंनी,
त्यात तुझाही मिसळला आवाज
म्हटलास ही तर बेइमानी
विश्वासघात सरासर!
होरपळा झाला तनामनाचा
सोसताना कोलाहल
नि वर उन्हाचे चटके
न् भुईचा रागराग जाळ
भाजून गेला, ते वेगळेच!

भरून उरला जन्माचा शीण
मरणाचेही भय झाले लटके.
लक्षात आले राजसवेळेला
आपण झालो आहोत अवांतर
तू तेवढा गेलास निघून दूर
राहण्यासाठी लोकप्रवाहाच्या समांतर

●

## या शहरातल्या सगळ्या माणसांना

या शहरातल्या सगळ्या माणसांना
सोडून गेली आहेत त्यांची घरं;
उलथपलथ झाली होती बहुधा
दुर्लक्षांच्या ठेचांनी फार त्यांची मनं!
कुणी विचारेना की कुणी ऐकेना
सारीजणं विरघळलेली कायावाचामनेकरून
आपल्याआपल्याच नतद्रष्ट तंद्रीत
दारंखिडक्याभिंती नि छपरं
पार गेली विरूनविखरून विस्मरणाच्या सांदीत.

मोकळ्या शंखांसारखी ऐकत बसली
बिचारी घरं आपापल्या आतली
स्तब्धतेची सुमशान गाज
ना वारा ना किनाऱ्याचा मागमूस
ना धडकणाऱ्या लाटांचाही आवाज
कुठे येईनाच की कसला अंदाज
राहणाऱ्यांच्या दुर्लक्षाचाही काही लागेना लाग
बगीचे, अंगणं, पडदे... सगळी बसली अशी,
की अगदी भंगारात मांडून ठेवावीत तशी.

रस्ते कानठळ्यांनंतरच्या सामसुमीनं
शिगोशीग भरून ओसंडले!
आणि पाखरांचे थवेदेखील घरट्यांसकट उडाले.
गेले ते गेलेच पळत्या आकाशाकडे
आता घरं तरी कशासाठी राहतील
मुकी बिचारी, सांगा त्यांच्या पाठीमागे?
घेतला त्यांनीही आपापला पाया खणून
बेघर झालो असं वाटलं म्हणून
बांधला डोईवर अन् केलं की कूच
सगळा मामला मुका न गुपचूप.

वाहनांच्या बिनसरत्या धावपळीचं
नि माणसांच्या अहेतूक गच्च पाचोळ्याचं
आता या शहरानं करावं तरी कसं नि काय?
बिनघरांचं नगर म्हणून राहण्याशिवाय
आता आहे तरी कोणता दुसरा तरुणोपाय?

## पडत राहिलाय पाऊस वरून, त्रयस्थ थंड

पडत राहिलाय पाऊस वरून, त्रयस्थ थंड
खालच्या पृथ्वीच्या बेजान थाळावर
जागा होतो कोलाहल
खोलवर रुतलेला दुःखाचा
बरसतो
माणसांच्या आधिभौतिक मुळांवर.

संथ होत रहाते बारिश एकाच लयीत
गगनाच्या गळ्यात हात घालून
वाऱ्याचे कपाळ कुरवाळणाऱ्या
उंचच उंच इमारतींच्या ऐषोआरामी सज्जांवर;
आणि विकासवाऱ्यांनी उधळलेल्या
हताशेच्या प्रवाहावर वाहून आलेल्या
विस्थापित वसाहतींच्या झोपड्यांमधून
गाडलेल्या नासाज स्वप्नांवर.
अंकुरतात की नाही
दुःखाच्या चिखलातून बदलबीजे
याची सही पर्वा
ना पावसाला ना मातीला ना चिखलाला
ना थरथरत्या छपरांना वा ढासळत्या दगडमातीला!
नसो मुळीच.

पण धुगधुगतेय कुठेतरी आशा
की ती आहे जरूर
त्या चिमण्या हिरव्या पात्याला.
जे झोपडीचे कलते दार उघडून बाहेर आलेय
पावसाला बिनदिक्कत छातीवर झेलतेय
नि गटारीच्या कडेवर जमलेली
दुनियाभरातली घाण अंधारात
शांतपणे बिटबिट्या रोमांनी न्याहाळतेय!
पडत राहूंदेत आता पाऊस, थंड त्रयस्थ
खालच्या पृथ्वीच्या सवर्ण थाळावर
शुकर है की
दुःखातून उगवलेय एक तलम हिरवे पाते
इथल्या बेजान विवर्ण करड्या माळावर!

**–माया पंडित**